मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२५ । पान १

# उद्योगनगरीमध्ये ‘आयआयएम’ उभारणीचा मार्ग मोकळा!

## एज्युकेशन हब पिंपरी-चिंचवड : मोशीतील ७० एकर जागा निश्चितीचा GR प्रसिद्ध

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आयआयएम उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मौजे मोशी, ता. हवेली, जि. पुणे येथील ग. नं. ३२७ (जुना ग.नं. ३२५) मधील ७७ हे. 0१ आर पैकी २८.00 हे. आर जमीन भारतीय प्रबंध संस्थान (खखच) नागपूर प्रशिक्षण आणि शिक्षण केंद्र उभारणे या प्रयोजनासाठी यांना प्रदान करण्यात आले. त्याचा अध्यादेश आज दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झाला आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-२०२०’ मध्ये ‘एज्युकेशन हब पिंपरी-चिंचवड’ असा संकल्प केला होता. त्यामध्ये आयआयएम आणि आयआयटी सारख्या संस्थांची केंद्र शहरात सुरू करण्यासाठी पाठपुरावा



केला जात आहे. ‘आयआयएम’ नागपूरचे संचालक भीमराया मैत्री म्हणाले की, ङ्गपुणे हे एक प्रमुख उत्पादन व आयटी केंद्र आहे. आजच्या बदलत्या जगात कार्यकारी अधिकाऱ्यांना नव्याने कौशल्य मिळवून देणे आणि आधीच्या कौशल्यांचा पुनर्विकास करणे आवश्यक आहे. उद्योग आमच्याकडे येण्याऐवजी, आम्हीच त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या गरजा पूर्ण करत आहोत.

सध्या आयआयएम नागपूर पुण्यात काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी विकेंड एमबीए कार्यक्रम चालवते. जो मोशी कॅम्पस सुरू झाल्यावर तिथे स्थलांतरित केला जाईल. संस्थेचे गोवा, हैदराबाद आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही विस्तार करण्याचे नियोजन आहे. पुण्यातील नव्या कॅम्पसमध्ये एक इनक्युबेशन सेंटर असणार आहे, तसेच उद्योगातील व्यावसायिकांसाठी खास तयार करण्यात आलेले पार्ट-टाईम आणि विकेंड अभ्यासक्रमही असतील.

> “ पुण्यातील कॅम्पस उत्रींर डलळशपलश आणि चरपरसशाशपीं मध्ये एक प्रमुख कार्यक्रम सुरू करणार आहे ङ्ख हा कोणत्याही आयआयएमचा मुख्य कॅम्पसच्या बाहेर सुरू होणारा पहिलाच उपक्रम असेल. ङ्गचाकण, तळेगाव, भोसरी, रांजणगाव एमआयडीसी आणि हिंजवडी आयटी पार्क यांसारख्या औद्योगिक केंद्रांच्या जवळ असल्यामुळे मोशीची निवड करण्यात आली. आम्ही सात-आठ ठिकाणांचा विचार करून ही निवड केली आहे.
>
> – भीमराया मैत्री, संचालक, आयआयएम नागपूर.

> “ पिंपरी-चिंचवडमधील शैक्षणिक क्षेत्रासाठी आजचा दिवस अत्यंत अभिमानास्पद आहे. उद्योगनगरी, कामगार नगरी, आयटी हब आणि आता एज्युकेशन हब म्हणून शहराची ओळख निर्माण होते आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ, संविधान भवन व आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र आणि आता आयआयएम सुरू होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आपले शहर शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पीएमआरडीएमध्ये तिघा अधिकाऱ्यांच्या बदल्या..

**आकुर्डी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (पीएमआरडीए) तिघा अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अभियांत्रिकी विभागातील कार्यकारी अभियंते संदीप खलाटे आणि संजय पाटील यांची बदली करण्यात आली आहे.




तर, लेखा विभागातील वरिष्ठ अधिकारी बसवेश्वर पाटील यांची पदोन्नतीसह बदली झाली आहे.

या बदल्यांनंतर अभियांत्रिकी विभागात मुख्य अधिकारी १ व २ अशी दोन्ही महत्त्वाची पदे रिक्त झाली आहेत. यामुळे विविध प्रकल्पांचे कामकाज आणि पाहणी प्रक्रियेत तात्पुरती अडचण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पीएमआरडीएकडून अतिक्रमण, विकास परवानगी, अग्निशमन आणि गृहनिर्माण यांसारख्या विभागांतही अनेक पदे रिक्त असल्याने कामाचा ताण विद्यमान अधिकाऱ्यांवर वाढला आहे. दरम्यान, नव्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची प्रतिक्षा असून, विभागीय काम काज सुरळीत ठेवण्यासाठी तात्पुरत्या जबाबदाऱ्या इतर अधिकाऱ्यांकडे सोपवल्या जात आहेत.

# मोशीतील एच.एच.एच.बी.चौक बनला मृत्यूचा सापळा!

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे-नाशिक महाम ार्गावरील श्री.नागेश्वर म हाराज उपबाजार समिती शेजारील पुणे-नाशिक महामार्गावरील चौक बेशिस्त दुचाकी,अवजड व रिक्षा चालकांमुळे अतिशय धोकादायक बनला आहे. वाहतूक नियंत्रक दिव्यांना न जुमानता नियमांचे उल्लंघन करत सर्व प्रकारचे वाहन चालक वाहन पुढे नेण्याच्या धुंदीत येथील स्थानिक नागरीक, शालेय विद्यार्थी व बाजार समितीत येणा-या शेतकरी व ग्राहकांसाठी यमदूत ठरत आहेत.



येथून जवळच दोन खाजगी शाळा आहेत म हिलावर्ग आपल्या लहान मुलांना शाळेत सोडायला व घ्यायला येतात तेव्हा रस्ता ओलांडून जाणे खूपच धोकादायक होते.वाहतूक नियंत्रक दिवे सुरू असताना देखील वाहनचालक झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे जाऊन रस्त्याच्या मधोमध वाहन नेऊन उभे करतात किंवा सिग्नलकडे दुर्लक्ष करून वाहन भरधाव वेगात नेतात. यामध्ये पी.एम.पी.एम. एल चालक, रिक्षाचालक आघाडीवर असतात. तसेच भोसरीकडून जाधववाडीकडून येणारी वाहने तर स-हास वेगात येऊन पायी चालणा-या नागरिकांच्या अंगावर वाहन नेऊन घाबरविण्याचे प्रकार नेहमीच घडत आहेत.

या चौकात अनेक स्थानिकांसह प्रवाशांचा बळी गेला आहे तर काहीजणांना कायमचे अपंगत्व आले आहे. जाधववाडीकडून येणा-या रस्त्यावरील गतिरोधक काढल्याने अपघातात वाढ झाली आहे.त्यामुळे येथे पुर्णवेळ वाहतूक पोलीस नेम न बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> “ एच.एच.एच.बी.चौक हा वाहनचाकासह नागरिकांसाठी, पादचाऱ्यांसाठी धोकादायक ठरतो आहे. आवश्यक त्या उपाययोजना होणे आवश्यक आहे. या चौकात सिग्नल व्यवस्थेसह, वाहतूक पोलिस यांची आवश्यकता आहे. ज्यामुळे वाहनचालक वाहतूकीच्या नियमांचे पालन करतील अनब अपघात होणार नाहीत.
>
> **-गणेश सस्ते,** (शिवयोध्दा ग्रुप मोशी)

> “ मागील आठवडयात वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडून या चौकाची पाहणी करण्यात आली आहे,त्यावेळी नागरिकांना येणा-या अडचणी निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत मात्र मनुष्यबळ कमी असल्याने या चौकात वाहतूक पोलीस नेम ण्यात येत नसल्याचे सांगण्यात आले. पेट्रोल पंपाकडे जाणा-या व येणा-या वाहनांसाठी सिग्नल नसल्याने देखील अपघात संभवतात त्यामुळे या चौकात महामार्ग प्राधिकरण, पिंपरी चिंचवड महापालिका व वाहतूक पोलीस यांच्या समन्वयातून योग्य त्या उपाय योजना करण्यात याव्यात.
>
> **-संतोष बोराटे,** सहशहर अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग.

> “ चौकामध्ये वाहतूक व्यवस्था सुरुळीत अनब नियमानुसार व्हावी यासाठी वाहतूक पोलिस आवश्यक आहे, मात्र मनुष्यबळाअभावी देण्यात आले नाही. मात्र चौकामध्ये अपघाताच्या घटना घडत असल्याने वाहतूक पोलिस देण्यासाठी प्रयत्न करू. तसेच सिग्नल व्यवस्थेसाठीही पाहणी करून बसविण्यासाठी सकारात्मक भूमिका घेऊ.
>
> **-दीपक सांळुखे,** पोलिस निरीक्षक, भोसरी वाहतूक विभाग.

---

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निर्माल्य संकलन मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद...

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी चिंचवड महापालिकेने गणेशोत्सवाच्या अनुषंगाने शहरातील नदी, नाले व तलाव प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी राबवलेल्या निर्माल्य संकलन उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील विविध भागांमध्ये १०३ ठिकाणी ठेवण्यात आलेल्या निर्माल्य कुंडांमध्ये गणेशोत्सव सुरू झाल्यापासून सात दिवसांत आज




दुपारी १२ वाजेपर्यंत जवळपास ५२ टन निर्माल्य संकलित करण्यात आले होते. महापालिकेच्या आरोग्य विभागातून ही माहिती देण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाने आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून निर्माल्य संकलनाची काटेकोर व्यवस्था केली आहे. या निर्माल्याचा कंपोस्ट व सेंद्रिय खत निर्मितीसाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे. नागरिकांनी निर्माल्य थेट नदी-नाल्यांमध्ये न टाकता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कुंडांमध्ये टाकल्यामुळे जलप्रदूषण रोखण्यास मोठी मदत होणार असून याबाबत व्यापक प्रमाणात स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी व स्वयंसेवक यांच्या मदतीने जनजागृती करण्यात येत आहे. पर्यावरणपूरक सण साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड म हापालिकेचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.